मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
पहिला मजला, २५-मर्झबान रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र .०२२-२२०१३६१७ ail ID: finance9-rdd@mah.gov

क्रमांक : झेडपीए-२०२३/प्र.क्र.११/वित्त-९, दिनांक : २० एप्रिल, २०२३.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय:- ग्रामपंचायत लेखे तसेच अभिलेख इ. सुस्थितीत ठेवणे व परिरक्षण करणेबाबत.

संदर्भ :- (१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१५/ प्र.क्र.१०/वित्त-९, दि.२५ मार्च, २०१५.
(२) ग्रामविकास व पंचायतराज विभाग, शासन पत्र क्र.झेडपीए-२०१३/ प्र.क्र.२७/वित्त-९, दि.१२ मे, २०१६.
(३) रत्नागिरी जिल्हा परिषदेशी संबंधित सन २०१२-१३ च्या पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल तसेच सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील पंचायत राज समिती (२०२०-२१)चा सातवा अहवाल (अहवाल क्र.१८६).

महोदय,

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिकारी हे क्षेत्रीय स्तरावर भेटी न देताच कामे करतात. अफरातफर व इतर नियमबाहय प्रकरणे ग्रामपंचायत स्तरावरील असताना केवळ ग्रामसेवकावर कारवाई करण्यात येते. ग्रामसेवक हा सर्वात निम्नस्तरावरील कर्मचारी असून, त्यापूर्वी चढत्या क्रमाने जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समित्या मधील विविध विभागाचे विस्तार अधिकारी, तालुक्याचे प्रमुख गट विकास अधिकारी आहेत. गटशिक्षणाधिकारी, महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी अपहार प्रकरणे झाली आहेत अथवा होत आहेत तेथील ग्रामसेवकावर कार्यवाही होते. तथापि, वरिष्ठ नियंत्रण अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई होत नसल्याचे अभिप्राय पंचायत राज समितीने त्यांच्या अहवालात दिले आहेत.

ग्रामपंचायत लेखे तसेच अभिलेख इ. सुस्थितीत ठेवणे व परिरक्षण करणे इ.बाबी संबंधित ग्रामपंचायतीत कार्यरत ग्रामसेवकाने हाताळावयाच्या आहेत. जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर सर्व अधिका-यांनी त्या त्या क्षेत्रात किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रात महिन्यातून एक वेळ तसेच गटविकास अधिकारी यांनी महिन्यातून किमान दोन वेळा आणि विस्तार अधिकारी यांनी महिन्यातून किमान ८ वेळा ग्रामपंचायतींना भेट देऊन सामान्य सखोल तपासणी करणे आवश्यक आहे. अभिलेखे तसेच लेखे यांची पाहणी करणे, तफावत अथवा इतर त्रूटी असतील तर तसेच त्याक्षणी सूचना देणे, दिरंगाई अथवा अक्षम्य चुका झाल्याचे निदर्शनास आल्यास तसेच ग्रामपंचायतींची कोणतीही तपासणी न करता मोघम स्वरुपाची कार्यवाही केली असल्याचे आढळून आल्यास, त्यांच्यावर विभागीय चौकशी अथवा दप्तर दिरंगाई बाबत उचित कारवाई करणे त्याचा अहवाल जिल्हा परिषदेस तसेच पंचायत समितीस वेळोवेळी देणे. गटविकास अधिकारी व विस्तार अधिका-यांना ग्रामपंचायतीमध्ये अफरातफर झाल्याचे लक्षात येत नसेल तर त्यांनी जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे असे समजण्यात येऊन संबंधित ग्रामसेवकाबरोबरच गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी हेदेखील दोषी असल्याने समजण्यात येईल. वरील नियम व सूचनांचे उल्लंघन करणा-या अधिका-यावर कडक कारवाई करण्यात येईल.

आपला,

(पो.द.देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी,

सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विभागीय उपायुक्त (विकास/पंचायत)
सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
मा.अ.मु.स.(ग्रामविकास) यांचे स्वीय सहायक,
सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग.